आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ सप्टेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान सुरू/ सकाळी ११ वाजेपर्यंत २६ पूर्णांक ७२ शतांश मतदान

- साडेबारा टक्के सीमाशुल्क भरुन आणलेलं खाद्यतेल ग्राहकांना वाढीव दरानं न विकण्याचं केंद्रसरकारचं विक्रेता संघटनांना आवाहन

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण नवी दिल्लीत एनपीएस- वात्सल्य योजनेचा प्रारंभ करणार

**आणि**

- महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या चैतन्यपर्वाची गणेश विसर्जनाने सांगता

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान आज सकाळी ७ वाजल्यापासून शांततेत सुरु झालं. सकाळी ११ वाजेपर्यंत २६ पूर्णांक ७२ शतांश टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे. अनंतनाग, पुलवामा, कुलगाम, शोपियाँ, दोडा, किश्तवाड आणि रामबन या सात जिल्ह्यांमधल्या मिळून २४ विधानसभा मतदारसंघांमधे मतदान होत आहे. ९० अपक्षांसह एकूण २१९ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. ऑगस्ट २०१९ मधे कलम ३७० रद्द झाल्यानंतर जम्मू काश्मीर केंद्रशासित प्रदेश घोषित झाला आणि त्यानंतर प्रथमच तिथं विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरता सर्वत्र सुरक्षाव्यवस्था कडक करण्यात आली आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या तुकड्याही तैनात आहेत. या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी २३ लाख २७

हजार ५८० मतदार पात्र आहेत. जम्मू काश्मीरमधून स्थलांतरित झालेल्या सुमारे ३५ हजार काश्मिरी पंडितांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरता जम्मूमधे १९ तर दिल्लीत ४ विशेष मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाची वेळ संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात काल उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३४ उमेदवारांनी माघार घेतली असून ४० मतदारसंघांमधे मिळून ४०१५ उमेदवार रिंगणात उरले आहेत. तिसऱ्या टप्प्यातलं मतदान येत्या १ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा आणि लोकशाहीच्या उत्सवात सामील व्हावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे. विशेषतः तरुण मतदारांनी मतदान करावं, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. केवळ मजबूत सरकारच दहशतमुक्त जम्मू काश्मीर देऊ शकतं, तसंच नागरिकांच्या हक्कांचं संरक्षण आणि गतिमान विकास घडवू शकतं असं शाह यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

साडेबारा टक्के सीमाशुल्क भरुन देशात आणलेलं खाद्यतेल ग्राहकांना किरकोळीत वाढीव दराने विकू नये असं केंद्रसरकारने खाद्यतेल विक्रेता संघटनांना सांगितलं आहे.  हा साठा पूर्णपणे संपत नाही.  तो पर्यंत किरकोळ  खाद्यतेलाचे भाव वाढवू नयेत असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. खाद्यतेलाच्या दरनिश्चितीबाबत अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाचे सचिव संजीव चोप्रा यांच्या अध्यक्षेतखाली काल नवी

दिल्ली इथं एका बैठकीत चर्चा झाली. देशांतर्गत तेलबिया उत्पादकांना चांगला भाव मिळावा या दृष्टीनं केंद्रसरकारने विविध खाद्यतेलांच्या आयातीवरचं सीमाशुल्क वाढवून २० टक्केपर्यंत वाढवण्याचा निर्णय अलिकडेच घेतला. गेल्या शनिवारपासून म्हणजे १४ सप्टेंबरपासून लागू झाला आहे. त्यामुळे प्रक्रीया न केलेल्या खाद्यतेलावर साडे सत्तावीस टक्के तर रिफाईन्ड पाम, सूर्यफूल आणि सोयाबीन तेलाच्या आयातीवर साडेबारा टक्क्यांऐवजी साडे बत्तीसटक्के सीमाशुल्क लागू झालं आहे. मात्र जुन्या दराने आयात केलेल्या तेलाचे दर किरकोळ विक्रीसाठी वाढवू नये असं सरकारने सांगितलं. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सध्या जुन्या दराने शुल्क भरुन आयात केलेल्या खाद्यतेलाचा सुमारे ३० लाख टन साठा उपलब्ध असून तो पुढचे ४५ ते ५० दिवस पुरेल याची सरकारला जाणीव असल्याचं अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज नवी दिल्लीत एनपीएस- वात्सल्य योजनेचा प्रारंभ करणार आहेत. या योजनेसाठीचा ऑनलाइन मंच आणि पुस्तिकेचं लोकार्पणही त्या करतील, तसंच या योजनेच्या अल्पवयीन लाभार्थ्यांना कायमस्वरूपी निवृत्ती खाते क्रमांक कार्डांचं वाटपही करतील. या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या वतीनं मुंबईतल्या अस्मिता सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक संस्थेत कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यात विद्यार्थ्यांना प्राण कार्डांचं वितरण केलं जाईल. एनपीएस- वात्सल्य योजनेद्वारे पालकांना आपल्या मुलांच्या भविष्यासाठी निवृत्तीवेतन खात्यात गुंतवणूक करता येईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिनी सुरु केलेल्या ‘एक पेड़ माँ के नाम’ या अभियानाअंतर्गत माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आजपर्यंत सुमारे सात हजार झाडं लावली आहेत. देशभरातल्या शहरी आणि ग्रामीण मिळून विविध कार्यालयात हे अभियान राबवण्यात आलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून अभियानात योगदान द्यायला सुरुवात केली. कालपासून सुरु झालेल्या स्वच्छता ही सेवा अभियानातही माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या कार्यालयांमधे वृक्षलागवडीचं काम हाती घेतलं आहे.

**<><><><><>**

स्वच्छ भारत अभियानाच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त, 'स्वच्छता ही सेवा २०२४' ही मोहीम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात देशभरात राबवली जात आहे. त्या अंतर्गत भारतीय रेल्वे विभागानेही आज नवी दिल्ली इथल्या रेल भवनमध्ये या मोहिमेची सुरुवात केली. रेल्वे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष सतीश कुमार यांनी या कार्यक्रमात रेल्वे कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून राजस्थान, मध्यप्रदेश आणि झारखंडच्या दौऱ्यावर जात आहेत. जयपूरमधल्या मालविय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाविद्यालयातल्या पदवीदान समारंभात त्या आज प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. विद्यार्थ्यांसाठीच्या नव्या वसतीगृहाचंही त्या उद्घाटन करणार आहेत.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी भारत आणि रोमानिया यांच्या संयुक्त टपाल तिकीटाचं अनावरण कालं नवी दिल्ली इथं केलं. यावेळी रोमानियाच्या

भारतातल्या राजदूत डॅनिएला मरियाना सेजोनोव उपस्थित होत्या. हे टपाल तिकीट भारत आणि रोमानिया यांच्यातल्या दृढ संबंधांचं प्रतिक आहे, असं जयशंकर यावेळी म्हणाले. दोन्ही देशातल्या ७५ वर्षांच्या राजनैतिक संबंधाचा गौरव करण्यासाठी हे टपाल तिकीट योग माध्यम असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

पर्यावरण **रक्षण**, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाबद्दल जागतिक कृषी मंचाच्या वतीनं आज त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्यांच्यासोबतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनाही २० देशांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सन्मानित केलं जाणार आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या चैतन्यपर्वाची काल गणेश विसर्जनानं सांगता झाली. महाराष्ट्रात सर्वत्र ढोल ताशांच्या गजरात, लेझीमच्या तालात, गुलालाची उधळण करत आणि पुढच्या वर्षी लवकर या अशी साद घालत, भाविकांनी लाडक्या बाप्पांना भावपूर्ण निरोप दिला. दहा दिवसांच्या घरगुती गणेश मूर्तींचंही विसर्जन काल करण्यात आलं. मुंबईत मोठ्या गणेशमूर्तींचं विसर्जन आज सकाळपर्यंत सुरु होतं. पुण्यात विसर्जन अजूनही सुरु आहे. राज्यात गणेशविसर्जनाच्या वेळी झालेल्या विविध दुर्घटनांमधे ५ जणांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

**आंध्र प्रदेशातल्या** विजयवाडा इथे आलेल्या पुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबाना मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी काल मदतीची घोषणा केली. विजयवाडा इथल्या सर्व ३२ प्रभागांमध्ये नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत दिली जाईल, तसंच पूरबाधित घरांची दुरुस्तीही केली जाईल, असं मुख्यमंत्री नायडू यावेळी म्हणाले.

पूरग्रस्त भागात तळमजल्यावर राहणाऱ्या कुटुंबांना प्रतिकुटुंब २५ हजार रुपये, पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबांना १० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात सततचा मुसळधार पाऊस आणि धरणातून पाण्याचा विसर्ग केल्यामुळे आलेल्या पुराचा फटका चोवीस जिल्ह्यातल्या पाच लाख लोकांना बसला आहे. राज्यातल्या प्रमुख शहरातल्या सखल भागात पाणी साचलं आहे. वाराणसी आणि प्रयागराजमधल्या हजारो कुटुंबांना मदत छावण्यांमध्ये स्थलांतरित केलं असून प्रशासनाकडून आवश्यक ती मदत त्यांना पुरवली जात आहे. वाराणसीतले सर्व घाट पाण्याखाली गेले असून नदीत नौकाविहार करण्यास बंदी घालण्यात आली आहे. एसडीआरएफ, एनडीआरएफ च्या जवानांकडून मदतकार्य सुरू आहे.

**<><><><><>**

**मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये** आज मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. **हरियाणा, चंदिगड, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि अंदमान-निकोबार** बेटांच्या काही भागांमध्येही मुसळधार पाऊस होईल. आज संध्याकाळपर्यंत **मध्य प्रदेशचा उत्तर भाग आणि उत्तर प्रदेशाच्या काही भागात** ताशी साठ किलोमीटर वेगानं वादळी वारे वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

***//<><><><><>//***